# विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे

## Vidyarthi Sahayyak Samiti, Pune

ही शिकण्याची आस,
हा बदलण्याचा ध्यास
यातूनच घडतो खरा
व्यक्तिमत्त्व विकास




**वार्षिक अहवाल २०२४-२०२५**

www.samiti.org

ISO 9001 : 2015 CERTIFIED


# संस्थापक



संस्थापक
**कै. डॉ. अच्युत शंकर आपटे**




**कै. सुमित्रा  केरकर**




**कै. हरिभाऊ फाटक**

# विश्वस्त मंडळ

**पद्मश्री प्रताप पवार**
अध्यक्ष,
सकाळ माध्यम समूह



**भाऊसाहेब जाधव**
कायम विश्वस्त,
कार्याध्यक्ष, मराठवाडा मित्रमंडळ,
पुणे




**तुकाराम गायकवाड**
कायम विश्वस्त,
उद्योजक



**तुषार रंजनकर**
कार्यकारी विश्वस्त,
उद्योजक



**संजय अमृते**
खजिनदार,
बँकिंग व वित्त क्षेत्र



**रत्नाकर मते**
अभियांत्रिकी सल्लागार



**डॉ. मकरंद फडके**
माहिती तंत्रज्ञान क्षेत्र



**प्रीती राव**
माहिती तंत्रज्ञान क्षेत्र
सामाजिक कार्यकर्त्या



**डॉ. ज्योती गोगटे**
उद्योजिका




**सुनंदा माने**
संचालक, लाही



**विनया ठोंबरे**
सामाजिक कार्यकर्त्या



**मनोजकुमार गायकवाड**
उद्योजक



**चंद्रशेखर पोतनीस**
माहिती तंत्रज्ञान क्षेत्र
उद्योजक



**प्रकाश आपटे**
कार्पोरेट सल्लागार
सामाजिक कार्यकर्ते



**नंदकुमार तळेकर**
आयुर्विमा सल्लागार

# समिती

## समितीचे घोषवाक्य

- सर्वांगीण शिक्षणातून युवा सक्षमीकरण

## ध्येय (Mission)

- समाजाच्या मदतीने आर्थिकदृष्ट्या गरजू आणि होतकरू युवकांच्या सक्षमीकरणासाठी योग्य सुविधा व संधी उपलब्ध करून देणे

## समितीचे धोरण

- योग्य व्यवस्थापन व गुणवत्तापूर्ण कार्यप्रणाली
- शालेय शिक्षणानंतर शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या युवावर्गाची भोजन व निवासाची अल्पदरात उत्तम सोय करणे
- समितीची मूल्ये रुजविणे
- जात, धर्म, पंथ निरपेक्ष विकास
- कालानुरूप विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे
- युवकांच्या सक्षमीकरणासाठी व उद्योजकता रुजविण्यासाठी प्रयत्न करणे
- सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असलेल्या व्यक्ती आणि संस्था यांच्यातर्फे आर्थिक तथा सर्वकष पाठबळ मिळविण्याचे सतत प्रयत्न करणे.

## मूल्ये

- स्वच्छता, समता, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, कृतज्ञता, व्यक्तिमत्त्व विकास, समाजाप्रती उत्तरदायित्व

## हेतू

- उच्चशिक्षणासाठी पुण्याला येणाऱ्या गरजू व होतकरू ग्रामीण विद्यार्थ्यांना अत्यल्प दरात वसतिगृह व भोजन यांची उत्तम सुविधा पुरवणे. दुर्बल घटकांतील विद्यार्थी आत्मविश्वासपूर्ण, स्वावलंबी व समाजाचा जबाबदार घटक व्हावेत, यासाठी पोषक वातावरण व तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे. त्यातून सामाजिक स्तर उंचावणे.

# समितीचे कार्य

ग्रामीण भागातून उच्च शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या गरीब, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अल्प दरात निवासाची व भोजनाची सोय व्हावी व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा, कालानुरूप नोकऱ्या कमी होत असल्याने विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी किमान १० टक्के उद्योजक घडावेत हा समितीचा उद्देश आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून समितीच्या कामाकडे पाहिले जाते. समिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत (क्र. २१९ ई, पुणे) असून संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर आहे.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवत्तेच्या जोरावर काहीतरी ध्येय ठेवून धडपडणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना मदतीच्या हेतूने ज्येष्ठ गणितज्ज्ञ डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी १९५५ मध्ये या कामाला सुरुवात केली.

पहाटे योगासने, रोज अर्धा तास श्रमदान, कमवा व शिका, देणगीदार पालकांची भेट अशा अनौपचारिक शिक्षणातून विद्यार्थ्यांचा विकास होतो. वाचनालय व अभ्यासिका संगणक प्रशिक्षण, परदेशी भाषा प्रशिक्षण, सिक्स सिग्मा, वैद्यकीय सुविधा देतानाच खेळ, मान्यवरांची व्याख्याने, गटचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा यातून त्यांचे सक्षमीकरण करत कृतज्ञतेची जाणीव देत सुजाण नागरिक बनविण्याचा प्रयत्न असतो.



# समिती दर्पण

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३० ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org

एप्रिल २०२४

## समितीची जागतिक भरारी

डॉ. मकरंद फडके, विश्वस्त

## स्वत:शीच स्पर्धा केल्यास विकास होईल : गायकवाड

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १७ - जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात काम करताना कुणाशी स्पर्धा करू नका. स्पर्धा करायचीच असेल, तर ती स्वत: शीच करा. त्यातून तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी साह्य मिळेल, असा सल्ला यशदाचे अतिरिक्त महासंचालक ... म्हणून बोलत होते. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, विद्यार्थी विकास केंद्राच्या कार्यवाह सीमा होस्कोटे, आपटे वसतिगृहाच्या पर्यवेक्षिका सविता भुके उपस्थित होते.

स्पर्धांमध्ये यश मिळवावे; पण स्पर्धेपलीकडे जाणे गरजेचे आहे. ... अभ्यास केल्यास ... विषयांची माहिती ... समतोल विचार ... तो अंगीकारावा ... गायकवाड

## विद्यार्थी सहाय्यक समितीचे काम ऑक्सिजन पेरण्याचे - प्रतापराव पवार

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) - विद्यार्थी सहाय्यक समितीतर्फे गरजू, होतकरू विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतून समाजात ऑक्सिजन पेरतो. ...

## Certificate of Registration

This is to certify that the Management System of

VIDYARTHI SAHAYYAK SAMITI (VASATIGRUHA VYAVASTHAPAN)

HO & SITE 1 : DR.ACHYUT S APTE VASATIGRUH, 1182/1/4, SHIVAJI NAGAR, F.C ROAD, PUNE : 411005, MAHARASHTRA, INDIA.

SITE2 : LALA LAJPATRAI VIDYARTHI BHAVAN, 103/A SENAPATI BAPAT ROAD, PUNE : 411016, MAHARASHTRA, INDIA.

SITE 3 : SUMITRA SADAN VASATIGRUH, 1137/13, MODEL COLONY, SHIVAJI NAGAR, PUNE 411016, MAHARASHTRA, INDIA.

has been audited by ICV and found to be in compliance with the requirements of the standard

ISO 9001:2015 (Quality Management Systems)

This certificate is valid for the following scope:

PROVISION OF ACCOMMODATION, FOOD, AND ENSURING OF OVERALL DEVELOPMENT OF THE STUDENTS FROM ECONOMICALLY WEAKER SECTION, HAVING RURAL BACKGROUND TO COMPLETE THEIR HIGHER EDUCATION

| | |
|---|---|
| Certificate No. | IN/94717154/9746 |
| Certificate Issue Date | 10/03/2025 |
| 1st Surveillance Due Date | 10/02/2026 |
| 2nd Surveillance Due Date | 10/02/2027 |
| Date of Expiry | 07/03/2028 |

CEO

ICV ASSESSMENTS PVT. LTD.

## शिस्तप्रिय, आदरभाव जपणारी पिढी घडावी

### अनिल गोगटे ; योगासन कक्षाचे उद्घाटन

पुणे, (वा.) महिला शिक्षण आणि सक्षमीकरण हे माझ्या पत्नीचे ध्येय आहे. तिच्या ध्येयपूर्तीसाठी आम्ही नेहमीच अशा सामाजिक संस्थांना सहाय्य करतो. शिस्तप्रिय, नैतिक आणि आदरभाव जपणारी पिढी घडायला हवी. विद्यार्थी साहाय्यक समिती युवा पिढीला घडवण्याचे काम करत आहे. डॉक्टर असलेल्या लीलावती या माझ्या बहिणीच्या नावाने समितीला ही देणगी दिली असून, त्यातून सत्कार्य घडेल, असा विश्वास आहे, अशी भावना उद्योजक अनिल गोगटे यांनी व्यक्त केली. येणाऱ्या देणग्यातून आनंद मोठा असल्याचे प्रेम गोगटे यांनी नमूद केले. विद्यार्थी सहाय्यक समितीच्या मुलींच्या नवीन वसतिगृहामध्ये उभारण्यात आलेल्या कै. डॉ. लीलावती गोगटे योगासन कक्ष व आरोग्य केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी गोगटे बोलत होते. या केंद्रासाठी प्रेम गोगटे व अनिल गोगटे यांनी विद्यार्थी सहाय्यक समितीला एक लाख अमेरिकन डॉलर ...

## समान भूमि...

प्रतापराव पवा...

## विद्यार्थी सहाय्यक समितीला एक कोटी

पुणे : अमेरिकेतील सुनील आणि साधना शेणॉय दाम्पत्याकडून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या 'एफसीआरए' (विदेशी योगदान नियमन कायदा) खात्यात एक लाख १५ हजार डॉलर म्हणजेच ९५ लाख २५ हजार रुपयांची देणगी जमा केली. गेल्या वर्षी त्यांनी ६,२०० डॉलर पाठवले होते. एक फेसबुक पोस्ट वाचनात आली अन् या दाम्पत्याने चौकशी करत माहिती घेत, समितीशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. ...

## संकट हीच संधी, हृदयातील आग हेच भांडवल


### प्रतापराव पवार यांचा कानमंत्र : विद्यार्थी साहाय्यक समितीतर्फे परिषद

पुणे, ता. २२ : ''आपल्या हृदयातील आग हेच वाढीचे गमक असते. ती असेल तर आपण कोणतेही ध्येय साध्य करू शकतो. आपल्यातील उणिवा दूर करून पुढे गेले पाहिजे. संकटाला न घाबरता प्रत्येकाने उद्योगातील गरजा ओळखून त्यादृष्टीने काम करावे. संकट हीच संधी मानून हृदयातील आग हे भांडवल बनवा,'' असा कानमंत्र 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी दिला.

## पुणतांबेकर, देशपांडे यांना पुरस्कार

पुणे, ता. २३ : ''बदलत्या काळ माणसाच्या समोर सतत नवी आव्हाने उभी करत असतो, त्याचप्रमाणे समाजातील प्रश्न, समस्यांचे स्वरूपही बदलत असतो. त्यांचा सामना करण्यासाठी आधुनिक काळात सेवाभावाला व्यावसायिकतेची जोड देऊन ...

# युवकांच्या परिवर्तनाचे काम



प्रताप पवार, अध्यक्ष

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्याशी मी १९७५ मध्ये जोडला गेलो. त्याला आता ५० वर्षे झाली. संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांनी, तू ही जबाबदारी पाहायची असे म्हणून तरुण वयात समितीच्या कामात ओढले. त्यांच्यासारख्या ध्येयवादी आणि निस्पृह व्यक्तीला नाही म्हणण्याचे धारिष्ट्य नव्हते. खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पुण्यात आल्यावर कमी खर्चात निवास-भोजनाच्या सुविधा देणे आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे या हेतूने अच्युतरावांसारखी समविचारी मंडळी काम करत होती. हे युवा परिवर्तनाचे काम समाजाच्या मदतीनेच करायचे आणि चांगल्या कामाला पैसे कमी पडत नाहीत, अशा या कामाबाबतच्या त्यांच्या संकल्पना स्पष्ट होत्या. त्याचा अनुभव आम्ही आजही घेत आहोत. गेली ७० वर्षे ग्रामीण भागातील हजारो युवकांच्या आयुष्यात समितीमुळे परिवर्तन झाले आहे.

शिक्षणाचा प्रसार वाढल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी या प्रवाहात मोठ्या प्रमाणात येत आहेत. त्यात मुलींची संख्या वाढते आहे. त्यांना संधी देण्याच्या उद्देशाने पुण्यात नव्या वसतिगृहाची उभारणी करून ३३६ मुलींची व्यवस्था वाढविली. पुण्याबाहेर प्रथमच अहिल्यानगरमध्ये परिमल व प्रमोद चौधरी फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्यातून ६० मुलींसाठी नवे वसतिगृह उभारले. दुबईस्थित उद्योजक विनोद जाधव यांच्या आर्थिक सहयोगातून १२० मुलांसाठी तेथेच एक वसतिगृह साकारते आहे. यांमुळे सुमारे १३०० हून अधिक विद्यार्थ्यांना या सुविधा देणे शक्य होत आहे. संस्थेचे काम विस्तारत असताना तांत्रिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी समितीने सेल्सफोर्स सॉफ्टवेअर प्रणाली लागू केली आहे. अशी प्रणाली घेणारी विद्यार्थी साहाय्यक समिती ही भारतातील पहिली सामाजिक संस्था आहे.

समितीत वास्तव्यास असणारी बहुतांश मुले-मुली ही शेतकरी कुटुंबातील आहेत. उच्चशिक्षण घेऊन नोकरीचा विचार करताना त्यांच्या मनात उद्योजकतेचा विचार पेरण्याचा संकल्प आम्ही केला आहे. त्यादृष्टीने उद्योजकांची व्याख्याने, काही कंपन्यांना भेटी, शिबिरे यांचे आयोजन केले जाते. त्याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. नोकरी मागणारा होण्यापेक्षा नोकरी देणारा घडविण्याचा आमचा मानस आहे.

शिक्षणासारख्या या पवित्र कार्यासाठी देशविदेशातून अनेक मदतीचे हात पुढे येत आहेत. निस्पृह कार्यकर्ते अमूल्य वेळ देऊन या कार्यविस्तारात मदत करत आहेत. माजी विद्यार्थी कृतज्ञतेच्या भावनेतून संस्थेला आर्थिक मदतीबरोबरच विविध जबाबदाऱ्या स्वीकारून हे काम पुढे नेण्यास सहकार्य करत आहेत, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, जाणकार या युवापिढीच्या परिवर्तनासाठी संस्थेसोबत जोडले जात आहेत. समाजानेसुद्धा आतापर्यंत विश्वासाने साथ दिली. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. संस्थापकांनी ज्या विचाराने हे काम सुरू केले, निष्ठेने ते सुरू ठेवले आणि विश्वासाने जबाबदारी टाकली तो विश्वास सर्वांच्या साथीने सार्थ ठरवू शकलो, याचे अंतरिक समाधान आहे. एका ध्येयाने, विचाराने जोडली जाणारी साखळी इतकी भक्कम असेल तर या संस्कारातून बाहेर पडणाऱ्या पिढीचे भविष्य उज्ज्वल आहे, यात शंका नाही.

# कामाचा आनंद



**तुषार रंजनकर,** कार्यकारी विश्वस्त

विद्यार्थी साहाय्यक समितीचे काम म्हणजे निस्पृहता, पारदर्शकता, सांघिक प्रयत्न आणि सामाजिक जाणीव यांचे समीकरण आहे. अनेकांच्या प्रयत्नांतून गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांचा विकास साधण्याचा हा संकल्प ७० वर्षे अव्याहत सुरू आहे. साहाय्यदात्यांच्या समितीवरच्या विश्वासातून कामाचा परिघ विस्तारतो आहे. पुण्यात ७ वसतिगृहांतून सुमारे १२०० विद्यार्थी तर अहिल्यानगर येथे दोन वसतिगृहांतून १८० विद्यार्थ्यांची सोय होते आहे. यात मुलींचे प्रमाण ६० टक्क्यांहून अधिक आहे.

व्यक्तीच्या विकासात शिक्षणाचे महत्त्व अनेकांनी जाणले. घरातील एकजण शिकला तर कुटुंब सुधारते या जाणिवेतून शिक्षणासाठी साहाय्य करण्याची आपल्याकडे मोठी परंपरा आहे. समितीला त्याच विचारातून पिढ्यानपिढ्या मदत करणारे देणगीदार लाभले आहेत. तसेच निस्पृहपणे वेळ देणारे कार्यकर्ते, माजी विद्यार्थीही आपापल्या परीने संस्थेसाठी योगदान देत आहेत. गेली ५० वर्षे अध्यक्ष असलेले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सतत काहीतरी नवीन करण्यासाठी प्रोत्साहन देणारे प्रतापराव पवार यांनी यावर्षी संस्थेला तब्बल पाच कोटी रुपयांची वैयक्तिक देणगी देऊन कुटुंबप्रमुख कसा असावा याचा वस्तुपाठ घालून दिला. तसेच केवळ नोकरीयोग्य विद्यार्थी तयार करण्यापेक्षा काही उद्योजक होण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले आणि त्याला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. समितीप्रमाणेच अनेक सामाजिक संस्थांचे पालकत्व स्वीकारत त्यांना प्रगतिपथावर नेणाऱ्या प्रतापरावांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी देदिप्यमान सोहळ्याचे आयोजन केले होते. या सर्व संस्थांनी एकत्र येत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. हा सन्मान एका व्यक्तीचा नव्हता, तर मूल्यांचा होता.


अशा मूल्यांचे महत्त्व समिती परिवाराला नेहमीच मोलाचे वाटते. समितीमध्येही विद्यार्थ्यांना स्वच्छता, समता, श्रमप्रतिष्ठा आणि कृतज्ञता ही मूल्ये केवळ शिकवली जात नाहीत, तर सर्वांच्या आचरणातून सिध्द होतात. समाजातील अनेक आदर्शांचा त्यांना परिचय दिला जातो. संस्थेचे माजी विद्यार्थी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात जेथे कुठे काम करतात तेथे या मूल्यांचा नक्कीच वेगळा ठसा आहे. कृतज्ञतेच्या जाणिवेतून अनेक माजी विद्यार्थी परत संस्थेकडे येत आहेत. संस्थेसाठी वेळ देताना आर्थिक जबाबदारीही उचलत आहेत. हे समितीचे मोठे यश आहे असे मला वाटते. येथील विविध उपक्रमांतून आणि माजी विद्यार्थ्यांच्या संवादातून जबाबदार युवा पिढी घडविण्याचे कार्य होते आहे. दरवर्षी हजारो कुटुंबातून आलेल्या, हजारो विचारांच्या तरुणांना या आदर्शांच्या मुशीत घडवण्याचे आव्हान मोठे असते. पण विश्वस्त, कार्यकर्ते, सल्लागार, माजी विद्यार्थी या सर्वांच्या अनुभवातून, प्रयत्नांतून ते साध्य आणि सिद्ध होत आहे. या कामाकडे आम्ही देशसेवा म्हणून पाहतो. छोट्या छोट्या प्रयत्नांतून या तरुणाईमध्ये होणारे बदल पाहिले की समाधानाचा आलेख उंचावतो. समितीत सर्वांना कामाचा आनंद मिळतो, तो यामुळेच.

# वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या



**डॉ. अच्युत शंकर आपटे**

मुली **१८३***




**सुमित्रा सदन**

मुली **१४६***



**नवीन वसतिगृह**

मुली **३३६***



**मधुभाऊ चौध वसतिगृह, अहिल्यानगर**

• मुली • मुले

धुळे (१९)
८ ११

जळगाव (३४)
१३ २१

छ.संभाजीनगर (४२)
२० २२

जालना (२०)
८ १२

अकोला (५)
३ २

नाशिक (३३)
२२ ११

नंदुरबार (४)
३ १

बुलढाणा (३६)
२६ १०

इतर राज्यांतून (७)
७ ०

अमरावती (६)
४ २

अहिल्यानगर (१३३)
८० ५३

वर्धा (६), नागपूर (२)
३ ३ २ ०


ठाणे (४), पालघर (२)
१ ३ १ १

भंडारा (३), गोंदिया (२)
२ १ २ ०

पुणे (३३५)
२१० १२५

वाशिम (८)
७ १

रायगड (६)
४ २




हिंगोली (१०)
४ ६

गडचिरोली (४)
४ ०

सातारा (५७)
३६ २१

परभणी (१९)
८ ११

चंद्रपूर (१०)
८ २

सिंधुदुर्ग (५), रत्नागिरी (२)
४ १ २ ०

सोलापूर (५५)
२९ २६

लातूर (५१)
३३ १८

यवतमाळ (२३)
१६ ७

कोल्हापूर (१०)
५ ५

सांगली (८)
७ १

धाराशिव (४८)
२८ २०

बीड (७४)
३६ ३८

नांदेड (२५)
१५ १०

६६१ + ४४७ = ११०८*

*प्रवेशित



मुली ६०*



लजपतराय विद्यार्थी भवन

मुले १३२*



पी. डी. कारखानीस

मुले १८५*



हरिभाऊ फाटक

मुले १२२*

*क्षमता

## अभ्यासक्रमानुसार विद्यार्थी यादी

| क्र | अभ्यासक्रम | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ट विद्यालय कला | ४ | ० | ४ |
| २ | कनिष्ट विद्यालय विज्ञान | २५ | ० | २५ |
| ३ | कनिष्ट विद्यालय वाणिज्य | १२ | १ | १३ |
| ४ | बी. ए. | ६३ | ३७ | १०० |
| ५ | बी. एड. | १ | ० | १ |
| ६ | बी.बी.ए. | १६ | १४ | ३० |
| ७ | बी.सी.ए. | २६ | ९ | ३५ |
| ८ | बी.ए.एम.एस. | १ | ० | १ |
| ९ | बी.सी.एस. | ३० | ३१ | ६१ |
| १० | बी.कॉम. | ६६ | ४९ | ११५ |
| ११ | बी.ई. | ५२ | ८९ | १४१ |
| १२ | बी.फार्म. | ७ | ३ | १० |
| १३ | बी.एस्सी. | ८९ | ५९ | १४८ |
| १४ | बी.एस्सी. नर्सिंग | ७ | १ | ८ |
| १५ | बी.टेक. | १४ | १६ | ३० |

| क्र | अभ्यासक्रम | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १६ | बी.ए.एल.एल.बी. | २३ | ९ | ३२ |
| १७ | बी. व्होक | ६ | १ | ७ |
| १८ | बी. पी. टी. | १ | ० | १ |
| १० | डिप्लोमा पॉलीटेक्निक | १८३ | १२१ | ३०४ |
| २० | डी. फार्म | १ | ० | १ |
| २१ | हॉटेल मॅनेजमेंट | २ | ० | २ |
| २२ | आय.टी.आय | ३ | २ | ५ |
| २३ | एम. बी. ए. | २ | १ | ३ |
| २४ | एम. सी. ए. | ५ | २ | ७ |
| २५ | एम. कॉम | १ | ० | १ |
| २६ | एम.एस्सी. | १६ | १ | १७ |
| २७ | एम सी. एस. | १ | ० | १ |
| २८ | एम. एस. डब्ल्यू | ३ | ० | ३ |
| २९ | सरफेस कोटिंग | १ | १ | २ |
| | **एकूण** | ६६१ | ४४७ | ११०८ |

# महाविद्यालयनिहाय विद्यार्थी यादी

| क्र | महाविद्यालय | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड सायन्स | १८ | १५ | ३३ |
| २ | आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स | ३ | ६ | ९ |
| ३ | अभिनव कला महाविद्यालय | ३ | ० | ३ |
| ४ | एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | १५ | १६ | ३१ |
| ५ | एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ फार्मसी | २ | २ | ४ |
| ६ | एआयएसएसएमएस इन्स्टिट्युट ऑफ इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ५ | १० | १५ |
| ७ | एआयएसएसएमएस पॉलिटेक्निक, पुणे | ११ | ७ | १८ |
| ८ | अष्टांग आयुर्वेद कॉलेज | १ | ० | १ |
| ९ | अण्णासाहेब मगर महाविद्यालय | ० | १ | १ |
| १० | बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | १ | १ | २ |
| ११ | बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स | ३५ | २० | ५५ |
| १२ | बाबुरावजी घोलप महाविद्यालय | १ | ० | १ |
| १३ | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, लवळे | ० | २ | २ |
| १४ | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वुमन | ४ | ० | ४ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉमर्स व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आर्ट्स कॉलेज | १ | ० | १ |
| १६ | डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर ऑफ वुमन | १ | ० | १ |
| १७ | कुस्रो वाडिया इन्स्टिट्युट  ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | १० | ६ | १६ |
| १८ | कल्पवृक्ष ज्युनिअर कॉलेज, अहिल्यानगर | १ | ० | १ |
| १९ | कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, पुणे | ० | २ | २ |
| २० | कर्वे इंन्स्टिट्युट ऑफ सोशल सर्विस | ३ | ० | ३ |
| २१ | के. बी. जोशी इन्स्टिट्युटट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी | ६ | 0 | ६ |
| २२ | डॉ. डी.वाय.पाटील आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आकुर्डी | ० | ३ | ३ |
| २३ | डीईएस टेक्निकल इंस्टिट्युट, पुणे | ३ | ७ | १० |
| २४ | डीईएस सोसायटीज एस. के. जिंदाल कॉलेज ऑफ नर्सिंग | ५ | ० | ५ |
| २५ | फर्ग्युसन कॉलेज | ७९ | ५३ | १३२ |
| २६ | गेनबा सोपानराव मोझे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ० | ६ | ६ |
| २७ | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | १५५ | १०५ | २६० |
| २८ | शासकीय तंत्रनिकेतन, अहिल्यानगर | २ | ० | २ |
| २९ | गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स | १ | ० | १ |
| ३० | हरिभाई. व्ही. देसाई कॉलेज ऑफ कॉमर्स, आर्ट्स अँड सायन्स | ५ | १ | ६ |
| ३१ | आय एल एस लॉ कॉलेज | ५ | १ | ६ |
| ३२ | इंटरनॅशनल इन्स्टिट्युट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | ० | १ | १ |
| ३३ | इंडसर्च इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च | ० | १ | १ |
| ३४ | इन्स्टिट्युट ऑफ डिझाईन अँड टेक्नॉलॉजी, अहिल्यानगर | २ | ० | २ |
| ३५ | आय एस बी एम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे | १ | २ | ३ |
| ३६ | लोकमान्य टिळक इन्स्टिट्युट ऑफ फार्मासिटीकल सायन्स | २ | ० | २ |
| ३७ | लक्ष्मणराव आपटे ज्युनिअर कॉलेज | २ | ० | २ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३८ | मराठवाडा मित्र मंडळ, कॉलेज ऑफ कॉमर्स | १३ | १७ | ३० |
| ३९ | मराठवाडा मित्र मंडळ, शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज | १ | ३ | ४ |
| ४० | मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कर्वे नगर | ५ | ३ | ८ |
| ४१ | एम आय टी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | ४ | १ | ५ |
| ४२ | मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स, गणेशखिंड | ३९ | ४४ | ८३ |
| ४३ | मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स, शिवाजीनगर | ८४ | ७६ | १६० |
| ४४ | मॉडर्न एज्युकेशन सोसायटी वाडिया कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे | ४ | ८ | १२ |
| ४५ | मॉडर्न लॉ कॉलेज, गणेशखिंड | १ | ० | १ |
| ४६ | महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, केटरिंग अँड टेक्नॉलॉजी | २ | ० | २ |
| ४७ | मामासाहेब मोहोळ कॉलेज, पौड रोड | १ | ० | १ |
| ४८ | मिटकॉन इन्स्टिट्युट, शिवाजीनगर | १ | ० | १ |
| ४९ | नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स | ३ | ३ | ६ |
| ५० | नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज | ७ | ० | ७ |
| ५१ | नवरोसजी वाडिया कॉलेज | ७ | ० | ७ |
| ५२ | न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर | ३ | ० | ३ |
| ५३ | न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर | ७ | ० | ७ |
| ५४ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, पुणे | ० | २ | २ |
| ५५ | पुणे विद्यार्थी गृह कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | २ | ५ | ७ |
| ५६ | पी. ई. एस. मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे | ३२ | ० | ३२ |
| ५७ | पुना कॉलेज ऑफ फार्मसी, कोथरुड | २ | ० | २ |
| ५८ | पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | १ | ० | १ |
| ५९ | रेसिडेंन्शिअल आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, ज्युनिअर कॉलेज, अहिल्यानगर | १२ | ० | १२ |
| ६० | श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती | १ | २ | ३ |
| ६१ | सर परशुरामभाऊ महाविद्यालय | १० | ९ | १९ |
| ६२ | श्रीमती सुधाताई मांडके कॉलेज, पौड रोड | ० | २ | २ |
| ६३ | सावित्रीबाई पुणे विद्यापीठ | ९ | ० | ९ |
| ६४ | संचेती हेल्थकेअर ॲकडमी | ७ | ० | ७ |
| ६५ | समाजभूषण आप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे | ५ | ० | ५ |
| ६६ | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | २ | ० | २ |
| ६७ | श्री सिद्धीविनायक आर्ट्स अँड कॉमर्स महिला महविद्यालय | १ | ० | १ |
| ६८ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ | २ | ० | २ |
| ६९ | एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर | १ | ० | १ |
| ७० | सिम्बायोसिस कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स | ३ | ० | ३ |
| ७१ | विद्या प्रसारिणीसभा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग | १ | ० | १ |
| ७२ | विश्वकर्मा इंस्टिट्युट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी | ३ | ३ | ६ |
| ७३ | व्हिजन पॅरामेडिकल इन्स्टिट्युट, पिंपरी | ० | १ | १ |
| ७४ | यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज | २ | ० | २ |
| | | **६६१** | **४४७** | **११०८** |

# वर्षभरातील महत्त्वाच्या घटना



## नगरला माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**अहिल्यानगर :** विद्यार्थी साहाय्यक समितीने नगर येथे नव्याने उभारलेल्या कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहात २८ एप्रिलला समितीच्या नगर जिल्ह्यातील माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. समितीच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार व्हावा, या हेतूने माजी विद्यार्थी मंडळाने हा मेळावा आयोजित केला होता. माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे यांनी मंडळाच्या कामाची माहिती दिली.

## 'समितीशी नाते म्हणजे परिसस्पर्श'

समितीतील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ६ एप्रिलला सदिच्छा समारंभ झाला. `समितीशी जुळलेले नाते म्हणजे आयुष्याला झालेला परिसस्पर्श आहे,` अशी भावना विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रमात सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींचे औक्षण करून, त्यांना गुलाबपुष्प देण्यात आले. प्रास्ताविक अनुष्का राऊत हिने केले. अनिकेत राक, अभिषेक आटोळे, आर्या देशमुख, साक्षी बोरगे, वेदांत दिवटे, वैष्णवी, शिवानी आव्हाड, पल्लवी जाधव, स्नेहा साळुंखे, जितेंद्र टिळे, सुमित लोळगे, सौरभ कोकरे, नदीम इनामदार, सुचेता देशमुख, साईनाथ कोळपे, साक्षी वाळके, संदेश पाटील, रोहिदास तोत्रे, वैभव जाधव, अजय पठाडे, नागेश पंचलिंग, राज शेख या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

## मराठा आंत्रप्रेन्युअर्स परिषदेत स्टॉल

मराठा आंत्रप्रेन्युअर्स असोसिएशनच्या वतीने २७ एप्रिलला पुण्यात सिद्धी गार्डन येथे आयोजित केलेल्या परिषदेदरम्यान स्टॉल उभारण्याची संधी विद्यार्थी साहाय्यक समितीला मिळाली.

## पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती

लोकसभा निवडणुकीचे औचित्य साधून समितीच्या मुलामुलींनी मतदान जनजागृतीसाठी पथनाट्य तयार करून ते ठिकठिकाणी सादर केले. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी पथनाट्याची कल्पना मांडली. हे पथनाट्य अत्यंत शिस्तबद्ध रीतीने कमला नेहरू पार्क, गुडलक चौक- कलाकार कट्टा व संभाजी उद्यान येथे सादर केले.

## कार्यकर्त्यांची कार्यशाळा

समितीच्या कार्यकर्त्यांची यावर्षीची कार्यशाळा ८ जून रोजी शिवापूर येथे जे. पी. नाईक ग्रामीण महिला विकासिनी संस्थेत झाली. कार्यशाळेत सुरुवातीला समितीने थिंक टँकमध्ये ठरविलेली उद्दिष्टे आणि त्यातील या शैक्षणिक वर्षात पूर्ण करावयाची उद्दिष्टे या अनुषंगाने विचारमंथन झाले.



## वसतिगृहाचे उद्घाटन

समितीच्या नगरमधील मुलींच्या वसतिगृहाचे उद्घाटन ७ जुलैला डॉ. प्रमोद चौधरी व परिमल चौधरी यांच्या हस्ते झाले. समितीचे पुण्याबाहेरील हे पहिले वसतिगृह असून परिमल व प्रमोद चौधरी फाउंडेशनच्या देणगीतून ते उभारण्यात आले आहे.



## जवानांशी बंधुत्वाचे नाते

पोलिस आणि लष्करी जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी समितीतील विद्यार्थिनींनी त्यांना राखी बांधून त्यांच्याशी बंधुत्वाचे नाते जोडले. 'धागा आपुलकीचा' या उपक्रमांतर्गत १९ ऑगस्टला रक्षाबंधनाचे औचित्य साधून विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या राख्या शिवाजीनगर पोलिस चौकीतील पोलिस बांधव आणि भगिनी, खडकीच्या आर्मी हॉस्पिटलमधील जवानांना बांधल्या. येरवडा मुक्त कारागृहातही हा उपक्रम राबविण्यात आला.

## विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाचे धडे

समितीच्या वसतिगृहांतील बहुतांश व्यवस्थापन हे विद्यार्थ्यांकडूनच केले जाते. येत्या शैक्षणिक वर्षासाठी या व्यवस्थापनाचे धडे देण्याकरता १५ व १६ जूनला शिबिराचे आयोजन केले होते. यात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दोन दिवसांच्या या शिबिरात सुप्रिया केळवकर, विश्वस्त तुकाराम गायकवाड, रत्नाकर मते, मनीषा गोसावी, हेमंत राजहंस, तसेच डॉ. भूषण केळकर, संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर, ज्ञानेश्वर गटकळ, डॉ. अभय व्यवहारे, हरीश अष्टेकर, प्रणय पाले यांनी मार्गदर्शन केले.

## अभ्यासले शेतीतील प्रयोग

कृत्रिम प्रज्ञेद्वारे (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) ऊसशेतीचे नियंत्रण, शेडनेटमध्ये मातीविना शेती असे शेतीतील अद्भूत प्रयोग पाहण्याची संधी समितीच्या कार्यकर्त्यांना मिळाली. ८ ऑगस्ट रोजी झालेल्या अभ्यासदौऱ्यात ३० कार्यकर्ते सहभागी झाले होते. बारामती ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी साकारलेल्या डेअरी फार्ममधील सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर जेनेटिक इम्प्रुव्हमेंट या केंद्राला भेट देऊन दूध उत्पादनाबद्दल माहिती घेतली. बारामती ॲग्रिकल्चर कॉलेजमधील अटल इनोव्हेशन सेंटर, इनक्युबेशन सेंटरही पाहिले.

## देणगीदार, हितचिंतकांचा मेळावा

समितीच्या पुण्यातील मुलींच्या वसतिगृहाचे काम पूर्ण झाले असून यंदापासून ३३६ विद्यार्थिनींना त्याचा लाभ मिळणार आहे. या वसतिगृहाच्या उभारणीत ज्यांनी योगदान दिले, ते देणगीदार, हितचिंतक यांचा मेळावा १२ जुलैला नवीन वास्तूत झाला. या मेळाव्याला समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, देणगीदार नितीन कारिया, हर्षल मोरडे, देणगीदार आणि समितीचे कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव उपस्थित होते.

## माजी विद्यार्थी मंडळातर्फे रक्षाबंधन

ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या मुलामुलींना सणाच्या दिवशी घरची आठवण येते. मात्र घरी जाणे शक्य नसते. त्यांचीही उणीव भरून काढून, त्यांना सणाचा आनंद देण्यासाठी माजी विद्यार्थी मंडळातर्फे रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला.

## विद्यार्थिनींनी अनुभवले 'माहेरपण'

वसतिगृहातील आठवणींना उजाळा देत सुखी संसाराच्या, करिअरच्या आणि मुलाबाळांच्या गप्पागोष्टी करत समितीच्या माजी विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा माहेरपण अनुभवले. माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी आयोजित माजी विद्यार्थिनींच्या मेळाव्यात. 'मिळुनी साऱ्या जणी, पुन्हा समितीच्या अंगणी' म्हणत वेगवेगळ्या बॅचमधील सुमारे शंभर माजी विद्यार्थिनीं सहभागी झाल्या. गाणी, सामूहिक खेळ, गप्पाटप्पा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण झाले.



## स्वातंत्र्यदिनानिमित्त झेंडावंदन

समितीच्या सर्व वसतिगृहांमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. लजपत भवन येथे कार्यकर्त्या सीमा होस्कोटे, सुमित्रा सदन येथे संजय अमृते यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. डॉ. आपटे वसतिगृहात प्रसिद्ध अभिनेते, सूत्रसंचालक, स्वरगंधर्व चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक योगेश देशपांडे यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. यावेळी स्वरगंधर्व चित्रपटात आशा भोसले यांची भूमिका केलेल्या अभिनेत्री- गायिका अपूर्वा मोडक विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी योगेश देशपांडे, अपूर्वा मोडक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## नगरच्या वसतिगृहात ध्वजवंदन

अहिल्यानगरमधील कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहात स्वातंत्र्यदिनी पक्षीमित्र प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. या निमित्ताने विद्यार्थिनींनी वसतिगृहाचा परिसर रांगोळ्यांनी सुशोभित केला होता.

## योगविषयक कोर्स

विद्यार्थी सहाय्यक समिती, प्राचीन संहिता गुरुकुल आणि योग महाविद्यालय, बारामती यांच्या सहयोगाने समितीमध्ये योगविषयक योग प्रोटोकॉल इन्स्ट्रक्टर (Yog protocol instructor) हा कोर्स घेण्यात आला. या अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेत समितीतील १८ पैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रात्यक्षिक परीक्षेत सर्व १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.उत्तीर्ण मुलांना प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम १९ ऑक्टोबरला आपटे वसतिगृहातील मोडक हॉलमध्ये झाला.

## विद्यार्थ्यांना समितीची ओळख

डॉ. आपटे वसतिगृह, लजपत संकुल तसेच सुमित्रा सदन वसतिगृहात नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी परिचय सभा झाल्या. या सभांचे स्वरुप यावेळी बदलले. समितीविषयी माहितीपट दाखविल्यानंतर कार्यकर्त्यांनी मुलामुलींना समितीविषयी प्रश्न विचारले आणि त्यांच्या उत्तरातूनच समितीची माहिती, नियम उलगडत गेले. कार्यकर्त्यांनी त्याचे निरसन केले. समितीच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.

## पाच खोल्यांचे नूतनीकरण

पी. डी. कारखानीस वसतिगृहातील पाच खोल्यांचे नूतनीकरण पर्सिस्टंट फाउंडेशनच्या देणगीतून करण्यात आले. या खोल्यांचे उद्घाटन पर्सिस्टंट फाउंडेशनच्या अध्यक्षा सोनाली देशपांडे यांच्या हस्ते झाले.

## सेल्सफोर्स प्रणाली लागू

समितीमध्ये प्रवेश प्रक्रिया, देणगीदार व्यवस्थापन, आणि वसतिगृह व्यवस्थापन यासाठी सेल्सफोर्स कंपनीची सॉफ्टवेअर प्रणाली लागू केली आहे. 'सेल्सफोर्स'च्या आर्या टेक यांच्यातर्फे ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यांच्यामार्फत अशी प्रणाली घेणारी समिती ही भारतातील पहिली सामाजिक संस्था आहे. समितीच्या विश्वस्त प्रीती राव यांच्या प्रयत्नातून ही प्रणाली मिळाली.

## प्रतापराव पवार यांचा सन्मान

विद्यार्थी साहाय्यक समितीचे गेल्या अर्धशतकापासून नेतृत्व करणारे, समितीप्रमाणेच अनेक सामाजिक संस्थांचे पालकत्व स्वीकारत त्यांना प्रगतिपथावर नेणारे समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनी योगदान दिलेल्या संस्थांच्या वतीने १३ ऑक्टोबरला त्यांचा सन्मान करण्यात आला. बालगंधर्व रंगमंदिरात झालेला हा कृतज्ञता सन्मान सोहळा विद्यार्थी साहाय्यक समिती, सकाळ रिलीफ फंड, सकाळ इंडिया फाउंडेशन, सकाळ सोशल फाउंडेशन, मराठवाडा मित्रमंडळ, ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती, स्व- रुपवर्धिनी, महाराष्ट्र मेडिकल फाउंडेशन, बाएफ, बालग्राम, बालकल्याण, वनस्थळी, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, सकाळ माध्यम समूह, इंडियन न्यूजपेपर सोसायटी, पिंपरी- चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, गर्जे मराठी ग्लोबल, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र, पुणे अंधशाळा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग आदी संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन श्री. पवार यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी सर्व संस्थांचे पदाधिकारी व उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात पवार यांच्या कार्याला सलाम केला. लेखक, अभिनेते, दिग्दर्शक योगेश देशपांडे यांनी मानपत्राचे वाचन केले. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. मराठवाडा मित्रमंडळाचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांनी आभार मानले.




## पर्यावरणपूरक गणेशोत्सव

समिती व विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने गणेशोत्सवात पर्यावरणपूरक विनावर्गणी गणपती आरास उपक्रम राबविण्यात आला. समितीच्या डॉ. आपटे वसतिगृह, सुमित्रा सदन, लजपत संकुलात दरवर्षीप्रमाणे तीन दिवसांचा उत्सव झाला. मुलींच्या नवीन वसतिगृहातही उत्सव साजरा करण्यात आला. सजावटीचे परीक्षण समितीच्या कार्यकर्त्या हेमा बापट आणि शुभांगी चिरपुटकर यांनी केले. विजेते पुढीलप्रमाणे– प्रथम- डॉ. आपटे वसतिगृह, द्वितीय- लजपत संकुल.

## ज्ञानसत्रात मार्गदर्शन

गणेशोत्सवानिमित्त आयोजित ज्ञानसत्रात पहिल्या दिवशी ८ सप्टेंबरला लजपत संकुल येथे डॉ. मृणाल नेर्लेकर, दुसऱ्या ज्ञानसत्रात श्री. मिलिंद देशमुख यांनी मार्गदर्शन केले. १० सप्टेंबरला डॉ. आपटे वसतिगृहात आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर ज्ञानसत्र झाले. प्रमुख पाहुणे विवेक सावंत यांनी एआय आणि मानवी बुद्धिमत्ता या विषयी सादरीकरण केले.

### ‘ऑलिंपिक २०२४’ देखाव्याला पसंती

गणेशोत्सवानिमित्त डॉ. आपटे वसतिगृहामध्ये ‘ऑलिंपिक २०२४’ हा देखावा तयार करण्यात आला होता. मॉर्डन कॉलेजमधील क्रीडा शिक्षिका प्रियदर्शनी कोकरे यांना हा देखावा खूप आवडला. समितीला देणगी देत त्यांनी तो देखावा आपल्या घरातील गौरी गणपती सजावटीसाठी घेतला.

## प्राध्यापकांची कार्यशाळा

महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास प्रबोधिनीच्या माध्यमातून राज्यभरातील प्राध्यापकांची कार्यशाळा २५ नोव्हेंबर रोजी लजपत वसतिगृहात झाली. या कार्यशाळेत ३० प्राध्यापकांनी सहभाग घेतला. समितीची वसतिगृहे कशी आदर्शवत आहेत, समता, स्वच्छता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर युवा परिवर्तन आणि सक्षमीकरणाचे काम कसे अखंडपणे चालले आहे, याचा अनुभव शिक्षकांनी घ्यावा, विद्यार्थ्यांकडून वसतिगृहांचे व्यवस्थापन हा अनोखा प्रयोग त्यांनी पाहावा, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन समितीत केले होते.

## विद्यार्थ्यांचा रायगड ट्रेक

विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ग़डकिल्ल्यांची माहिती व्हावी, तेथील निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेता यावा, त्याचबरोबर परिसरातील स्थानिक लोकांना समितीविषयी माहिती देऊन संपर्क वाढवावा, या उद्देशाने समितीच्या वतीने एक दिवसाच्या रायग़ड ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. कार्यकर्ते श्री. निसार चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली २० ऑक्टोबर रोजी काढलेल्या या ट्रेकमध्ये २५ मुले, २७ मुली असे ५२ जण सहभागी झाले होते.

## पीचफेस्ट- २०२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि उपकरणशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या पीचफेस्ट-२०२४ या स्पर्धेत समितीतील विद्यार्थिनी साक्षी सुर्वे व साक्षी चव्हाण यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेच्या माध्यमातून उद्योगविषयक सृजनशील कल्पनांना चालना देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. स्पर्धेत पुणे शहर व परिसरातील २८ स्टार्टअप्स सहभागी झाले होते.

## हितचिंतकांसाठी ‘गीतरामायण’

गेली ७ दशके मराठी रसिकांच्या मनावर गारूड केलेल्या ‘गीतरामायणा’चा आनंद २६ नोव्हेंबर रोजी समितीचे देणगीदार आणि हितचिंतकांनी लुटला. ग. दि. माडगूळकर यांनी रचलेली आणि सुधीर फडके यांनी संगीतसाज चढविलेली ही अजरामर कलाकृती श्रीधर फडके यांच्या मुखातून ऐकताना श्रोत्यांनी जणू रामायणाचा काळ अनुभवला. टिळक स्मारक मंदिरात रसिकांच्या भरगच्च उपस्थितीत हा ‘गीतरामायण’ कार्यक्रम झाला.

## दिनदर्शिकेचे प्रकाशन

समितीच्या सन २०२५च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन उद्योजकता परिषदेच्या दरम्यान मान्यवरांच्या हस्ते झाले. या बारा पानी दिनदर्शिकेत इंग्रजी महिन्यांतील तारखांबरोबरच मराठी महिन्यांतील तिथी, सणवार यांची माहिती आहे. प्रत्येक महिन्याच्या मागील पानावर समितीविषयी माहितीचे लेख आहेत. जाहिरातींच्या माध्यमातून संपूर्ण खर्च करण्यात आला आहे.

## रोबोटिक्स : अर्थार्जनाची संधी

रोबोटिक्स क्षेत्रातील ज्ञान ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याचे काम करणाऱ्या तेलंगणातील सोहम ॲकॅडमी या संस्थेने समितीच्या लजपत भवन वसतिगृहात ५ डिसेंबर रोजी “Train the Trainer” कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये समितीतील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यांना केवळ रोबोटिक्सचे ज्ञान मिळाले नाही, तर पुण्यातील पाच शाळांतील विद्यार्थ्यांना ते शिकवून अर्थार्जनाची संधीही मिळाली.

## परांजपे, भागवत यांची व्याख्याने

कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व विकास तसेच स्वयंविकासावर आधारित सत्र लजपत संकुलात झाले. यात पराग परांजपे व राजीव भागवत यांची व्याख्याने झाली. पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या ६५ विद्यार्थ्यांनी या सत्रात सहभाग घेतला. कॉर्पोरेट क्षेत्रात प्रवेश कसा करावा, त्यातील संधी कोणत्या, बायोडेटा कसा लिहावा, मुलाखतीदरम्यान स्वतःला कसे सादर करावे, याविषयी मार्गदर्शन केले.





## योग हॉल, आरोग्य केंद्राचे उद्घाटन

मुलींच्या नवीन वसतिगृहात अमेरिकास्थित अनिल व प्रेमा गोगटे यांच्या देणगीतून साकारलेल्या योगा हॉल आणि आरोग्य केंद्राचे उद्घाटन २ जानेवारीला झाले. या कार्यक्रमाला गोगटे दांपत्यासह त्यांची कन्या, जावई व दोन नाती उपस्थित होत्या. आरोग्य केंद्राला गोगटे यांच्या भगिनी डॉ. लिलावती यांचे नाव देण्यात आले आहे.

## चौदा विद्यार्थ्यांचा गौरव

कमवा व शिका उपसमिती विभागाअंतर्गत कै. अविनाश दिगंबर ठोंबरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि श्री. वैभव अविनाश ठोंबरे यांच्या जन्मदिनानिमित्त ४ जानेवारीला डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृहात उत्कृष्ट कमवा व शिका करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. समितीच्या ७ वसतिगृहांमधून प्रत्येकी दोन अशा १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना पारितोषिक स्वरूपात रुपये १४०० रोख तसेच प्रमाणपत्र देण्यात आले.

## बाजीप्रभू विद्यालयात स्पर्धा

डॉ. अच्युतराव आपटे यांच्या स्मृतिदिनानिमित्त सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत १२ जानेवारीला गोखलेनगरमधील वीर बाजीप्रभू विद्यालयात चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन गटांत झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत पहिली ते सातवीतील एकूण ३१ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. चित्रकला स्पर्धाही दोन गटांत झाली. त्यामध्ये एकूण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## चंद्रशेखर सावंत यांचे मार्गदर्शन

डॉ. अच्युतराव आपटे यांच्या स्मृतिदिनानिमित्त ७ जानेवारीला डॉ. आपटे वसतिगृहामध्ये Accountability and Responsibility या विषयावर सत्र झाले. यात पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी मार्गदर्शन केले.

## जागतिक उद्योजकता परिषद

पुण्यात १० व ११ जानेवारीला जागतिक उद्योजकता परिषद झाली. समितीच्या ५० आजी- माजी विद्यार्थ्यांना या परिषदेत सहभाग घेण्याची संधी मिळाली. तेथे समितीचा स्टॉलही होता. या परिषदेचे आयोजन पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी, गर्जे मराठी आणि महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांनी केले होते.

## शिवाई कृषी पर्यटन केंद्राला भेट

समितीच्या उद्योजकता विकास केंद्रांतर्गत ११ जानेवारीला खेड-शिवापूरयेथील सुभाष पाळेकर नैसर्गिक कृषी पर्यटन केंद्र संचलित शिवाई ॲग्रो टुरिझम येथे अभ्यास सहल आयोजित केली होती.

## प्रेरणा देणारी अभ्यास सहल

आधुनिक शेती आणि तंत्रज्ञानाची ओळख करून घेण्यासाठी समितीच्या उद्योजकता विकास केंद्रांतर्गत बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राच्या कृषिक प्रदर्शन पाहण्यासाठी १९ जानेवारीला अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ही सहल केवळ अनुभव शिक्षण देणारी नव्हे, तर विद्यार्थ्यांना प्रगतीशील विचारांची प्रेरणा देणारी ठरली.



## गायकवाड यांच्या हस्ते ध्वजवंदन

देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन समितीत उत्साहाने साजरा करण्यात आला. मुलींच्या नवीन वसतिगृहाच्या आवारात ध्वजवंदन झाले. भारत विकास ग्रुपचे (बीव्हीजी) संस्थापक, व्यवस्थापकीय संचालक हनुमंत गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. यानिमित्त विद्यार्थी- विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात व्यंगचित्र, छायाचित्रण, हस्ताक्षर, रांगोळी, पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल- प्रॉडक्ट प्रेझेंटेशन अशा स्पर्धा झाल्या.

या वसतिगृहातील दुसऱ्या मजल्याला कै. श्रीमती पुष्पलता नितीन कारिआ यांचे नाव देण्यात आले असून देणगीदार बांधकाम व्यावसायिक नितीन कारिआ यांच्या हस्ते याचे उद्‌घाटन झाले. तिसरा मजल्यासाठी मराठवाडा मित्रमंडळाने देणगी दिली असून त्याचे उद्‌घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष आणि समितीचे कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव यांच्या हस्ते झाले. प्रीती आणि जय राव यांनी दिलेल्या देणगीतून चौथ्या मजल्याचे काम झाले असून त्या दोघांच्या हस्ते या मजल्याचे उद्‌घाटन झाले. त्याचप्रमाणे कै. विजया सहस्त्रबुद्धे आणि कै. अमोघ दाते यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या संगणक कक्षाचे उद्‌घाटनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते झाले.

## एपिरॉकच्या सहकार्याने ग्रंथालय

मुलींच्या नवीन वसतिगृहात एपिरॉक मायनिंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या आर्थिक सहकार्याने बांधलेल्या नवीन ग्रंथालयाचे उद्‌घाटन २४ जानेवारीला झाले.यावेळी कंपनीचे प्रतिनिधी श्री. अरुणकुमार गोविंदराजन (अध्यक्ष, एपिरॉक इंडिया), ओलिव्हिया लोनविक (उपाध्यक्ष) आणि त्यांची टीम उपस्थित होती.

## स्ट्रेस मॅनेजमेंटचे सत्र

समिती व रोटरी क्लब प्राइड पुणे यांच्या वतीने ९ फेब्रुवारी रोजी डॉ. आपटे वसतिगृहात मेंटल हेल्थ अँड स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावर सत्र झाले. यावेळी मुलींना मेंटल हेल्थ अँड स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावरील चित्रफित दाखवण्यात आली.

## विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा

समितीत होणारे विविध कार्यक्रम, उपक्रम यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला. समितीत राहात असल्याने मुली सुरक्षित असल्याचा विश्वास आहे, त्यामुळेच दूर अंतरावरील छोट्या गावात आम्ही शांतपणे झोपू शकतो, काळजी वाटत नाही, अशी भावना समितीतील विद्यार्थी- विद्यार्थिनींच्या पालकांनी व्यक्त केली. प्रजासत्ताक दिनी समितीतील पालकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. राज्यभरातून वेगवेगळ्या गावांतून पालक या मेळाव्यात सहभागी झाले होते.



## स्पर्धांद्वारे विविध कौशल्यांचा विकास

### विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद, परीक्षकांकडून सादरीकरणाचे कौतुक

विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व, सृजनशीलता आणि सादरीकरण कौशल्ये विकसित करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने वार्षिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

**विविध स्पर्धांमधील प्रथम तीन विजेते पुढीलप्रमाणे-**

**सुमित्राताई केरकर कथाकथन स्पर्धा-**
साक्षी नेटके (डॉ. आपटे वसतिगृह), प्राजक्ता जामोदे (सुमित्रा सदन), साक्षी सुर्वे (सुमित्रा सदन). परीक्षक- संग्राम रेडके, दीपक पिंपळे, ज्ञानेश्वर जाधवर

**डॉ. अच्युतराव आपटे वादविवाद स्पर्धा-**
**सकारात्मक बाजू-** श्रद्धा माधव, कल्याणी पोटे, पर्णवी म्हस्के
**नकारात्मक बाजू-** माहेश्वरी गिरडे, मधुरा जोशी, समीक्षा राठोड. परीक्षक- मोहित सावंत, सौगंध देशमुख

**Extempore Competition-**
वैष्णवी शेळके (डॉ. आपटे वसतिगृह), आर्या देशमुख (नवीन मुलींचे वसतिगृह), क्रांती निकम (नवीन मुलींचे वसतिगृह). परीक्षक- गुणरत्न सोनटक्के, एअर कमोडोर एस. आर. घारपुरे

**काव्यवाचन स्पर्धा-**
मधुरा जोशी (नवीन मुलींचे वसतिगृह), साक्षी थोरात (सुमित्रा सदन), प्रमिला केळे (डॉ. आपटे वसतिगृह). परीक्षक- आदित्य माळी, राधिका पवार

**आचार्य स. ज. भागवत वक्तृत्व स्पर्धा-**
श्रद्धा माधव (सुमित्रा सदन), माहेश्वरी गिरडे (डॉ. आपटे वसतिगृह), समृद्धी शिर्के (नवीन मुलींचे वसतिगृह). परीक्षक- राहुल जाधव, रचना परदेशी

**पी. डी. कारखानीस इंग्लिश PPT प्रेझेंटेशन-**
पर्णवी म्हस्के (नवीन वसतिगृह), प्रतिक माणकर (लजपत संकुल), सानिका येळमाट (नवीन वसतिगृह). परीक्षक- डॉ. अमोल निकाले, दशरथ गावीत

**मॉडेल प्रेझेंटेशन स्पर्धा-**
यज्ञेश चौधरी आणि अरविंद काळे (लजपत संकुल), चैतन्य अनारसे (लजपत संकुल), समृद्धी कोल्हे (डॉ. आपटे वसतिगृह).



## दिवाळी निधी समितीकडे सुपूर्त

समितीतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून दिवाळीच्या सुटीत दिवाळी निधी संकलन योजना राबविण्यात येते. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांच्या परिसरात संस्थेच्या कार्याचा प्रसार व्हावा, निधी संकलनाची जाणीव त्यांच्यात निर्माण व्हावी या होतूने शंभर रुपयाप्रमाणे संकलन केले जाते.

यावर्षी एकूण २४ लाख रुपये एवढा निधी विद्यार्थ्यांनी जमा केला. निधीचा धनादेश समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, खजिनदार संजय अमृते व कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.

## ‘स्वरगंधर्व’चे प्रदर्शन

संगीताच्या क्षेत्रात बाबूजी अर्थात सुधीर फडके यांचे नाव अजरामर आहे. अशा या बाबूजींचा जीवनपट समितीच्या विद्यार्थ्यांसमोर उलगडला आणि मोठा कलाकार होण्यासाठी किती जिद्द, चिकाटी, हालअपेष्टा सोसण्याची तयारी आणि संयम लागतो, याचा प्रत्यय त्यांना आला. ६ मार्च रोजी झालेल्या विशेष कार्यक्रमात हा चित्रपट दाखविण्यात आला. त्याचबरोबर चित्रपटाचे लेखक- दिग्दर्शक योगेश देशपांडे आणि चित्रपटात आशा भोसले यांची भूमिका साकारलेल्या अभिनेत्री अपूर्वा मोडक यांच्याशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

## एसपीके फार्म्सला भेट

समितीच्या उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने नाशिक व शिर्डी येथील एसपीके फार्म येथे १ व २ मार्च रोजी शैक्षणिक दौऱ्याचे आयोजन केले होते. त्यात विद्यार्थ्यांना शाश्वत आणि नैसर्गिक शेतीचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. ग्रामीण भागातून आलेल्या या विद्यार्थ्यांना शून्य बजेट नैसर्गिक शेती या फायदेशीर आणि पर्यावरणपूरक संकल्पनेची माहिती मिळाली.

## अभियंता दिन साजरा

अभियंता दिनाचे औचित्य साधून ‘प्रौद्योगिक : शाश्वतता’ या विशेष कार्यक्रमाचे १४ व १५ सप्टेंबर रोजी आयोजन केले होते. अभियांत्रिकी क्षेत्रातील नावीन्य, सहयोग आणि उत्कृष्ट योगदान यांची माहिती करून घेणे, हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

## 'शांती सदन' मजल्याचे उद्घाटन

११ फेब्रुवारीला समितीच्या मुलींच्या नवीन वसतिगृहातील पाचव्या मजल्याचे उद्घाटन सौ. रजनी आणि अशोक शेंदुरे यांच्या हस्ते झाले. या मजल्यासाठी शेंदुरे दांपत्याने अर्थसाह्य केले आहे. या मजल्याला ‘शांती सदन’ असे नाव देण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांना देशभक्तीची प्रेरणा

विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील (एनडीए) शिस्तबद्ध जीवनशैलीचा आणि संरक्षण क्षेत्रातील कठोर प्रशिक्षणाचा अनुभव देण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीत समितीतील १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पर्यवेक्षक सविता भुक्ते यांच्या मार्गदर्शनाखाली २६ नोव्हेंबर रोजी या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय परेडचा अविस्मरणीय अनुभव घेतला.

## ‘आयएसओ’ मानांकनात सातत्य

समितीने वसतिगृह व्यवस्थापनासाठी तीन वर्षांपूर्वी ‘आयएसओ’ गुणवत्ता प्रणाली लागू केली. याचे सातत्याने ऑडिट होत असून त्यात सुधारणाही होत आहे. तीन वर्षांसाठी याचे नूतनीकरण झाले.

## राष्ट्रीय एकात्मतेचे विद्यार्थ्यांना धडे

विद्यार्थी विकास केंद्र आणि ज्ञानप्रबोधिनीचा ज्ञान सेतू प्रकल्प यांच्या वतीने १६ फेब्रुवारी रोजी एक कार्यशाळा झाली. राष्ट्रीय एकात्मता वाढवणे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, विविध संस्कृतींचा आदर करणे आणि विद्यार्थी विकास साधणे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता. ३५ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

## ‘लेखक आपल्या भेटीला’

‘लेखक आपल्या भेटीला’ या उपक्रमांतर्गत २७ फेब्रुवारी रोजी लेखिका डॉ. स्मिता निखिल दातार यांनी विद्यार्थी- विद्यार्थिनींशी संवाद साधला. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून मुलींच्या नवीन वसतिगृहात आपल्या लेखनप्रवासाविषयी डॉ. दातार यांनी मनोगत व्यक्त केले.

## वाचन प्रेरणादिननिमित्त उपक्रम

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा होतो. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. याचे औचित्य साधून १५ ऑक्टोबरला वाचनदिन साजरा झाला. यात विद्यार्थ्यांना वाचलेल्या पुस्तकाविषयी बोलण्याची, अभिप्राय व्यक्त करण्याची संधी देण्यात आली.

## माजी विद्यार्थी मेळावा

समितीच्या माजी विद्यार्थ्यांचा ३६ वा स्नेहमेळावा २३ फेब्रुवारी रोजी झाला. राज्यातून सुमारे ५५० विद्यार्थी यात सहभागी झाले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ माजी विद्यार्थी ज्ञानेश्वर गटकळ होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी महेंद्र बिडवई, पुष्पा आरोटे उपस्थित होते. यावेळी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, सचिव मनीषा गोसावी आदी उपस्थित होते, यंदाच्या मेळाव्याचे प्रायोजकत्व जुन्नर तालुक्यातील माजी विद्यार्थ्यांकडे होते.

# माजी विद्यार्थ्यांचे यश

## जडणघडणीचे श्रेय समितीला



शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथे २०१२ साली माझे Metallurgical engineering शिकत असताना समितीतील माझा प्रवास सुरु झाला. योगासनांपासून होणारी दिवसाची सुरुवात, वसतिगृहाचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी, रात्रीची प्रार्थना, कमवा व शिका आणि पाल्य-पालक योजनेमध्ये पालकांसोबत होणारे संवाद या सगळ्यांत आपण घर सोडून बाहेर शिकायला पुण्यात आल्याचा समितीने कधी भास होऊ दिला नाही. शिस्तबद्ध नियम आणि फक्त अभ्यासच नव्हे तर वक्तृत्व, क्रीडा आणि कला या क्षेत्रांमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांनी स्वतःला प्रगत व्हावे, अशा अनेक संधी समितीच्या माध्यमातून उपलब्ध झाल्या. माझे समितीमध्ये वास्तव्य जेमतेम ३ वर्षांचे. पुढे Dana Spicer कंपनीमध्ये काम करताना Bachlors of engineering पूर्ण केले. प्रोजेक्ट मॅनेजमेंट मध्ये उच्च शिक्षण घेतले. गेल्या ८ वर्षांपासून मी Bekaert industries मध्ये कार्यरत आहे. . सध्या Global quality engineer या पदावर मी कार्यरत असून European आणि Chinese plants साठी Quality systems डेव्हलप करत आहे. याचे श्रेय मी नेहमीच समितीला देते. कारण जिद्द, कष्ट करण्याची शिकवण, स्वावलंबन आणि ध्येयवादी नेतृत्वाचे बीज विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे, त्याला फुलवण्याचे प्रोत्साहन समिती देते आणि तेच आम्ही पुढे आमच्या दैनंदिन आयुष्यात लागू करतो. यातून जे परत मिळते त्याची तुलना शब्दांत करणे शक्य नाही. मी समितीची शतशः आभारी राहीन.

**सुचिता जेजुरकर,**

ग्लोबल क्वॉलिटी इंजिनिअर, बेकर्ट इंडस्ट्रिज

## समितीचे संस्कार खूप उपयोगी



मी मूळची लातूरची. सध्या व्हिजिटिंग लेक्चरर म्हणून गरवारे आणि वाडियामध्ये कार्यरत आहे. समितीत १९८७ ते ८९ मध्ये होते. घरातील वातावरण साहित्य, कला, संस्कृती आणि सामाजिक जाणीव असलेले. लातूर येथील चित्रकला महाविद्यालयातून ATD चे शिक्षण घेतले. लगेच शाळेत नोकरी लागली पण पुढील शिक्षणाची तीव्र इच्छा असल्याने पुण्यात अभिनव कला महाविद्यालयात GD, ART साठी प्रवेश घेतला.

समितीमध्ये राहण्याची सोय झाली. इथली कडक शिस्त व कमीतकमी येणारा खर्च पाहून पालक निश्चिंत झाले. स्वावलंबन, स्वच्छता, मैत्रीपूर्ण व्यवहार इतर कला गुणांना वाव, सामाजिक मूल्य, योगासने असे संस्कार खूप उपयोगी ठरले. समितीच्या विश्वस्त निर्मलाताई पुरंदरे यांच्या वनस्थळीच्या मासिकासाठी २८ वर्ष चित्र आणि मुखपृष्ठाच्या कामाची संधी मिळाली. ज्येष्ठ पत्रकार वसंत काणे यांच्या रोहिणी मासिकासाठी कथा चित्रांसाठी काम केले. नाटकाची आवड असल्याने राज्य नाट्य स्पर्धेसाठी अनेक नाटकातून कामे केली. लातूर व बालगंधर्व येथे सोलो प्रदर्शन भरवले. २००० साली मिस्टर धनंजय देशपांडे व मी मिळून भारतीय कला मंचची स्थापना केली. त्या अंतर्गत अनेक नवोदितांना संधी देत "कलाकार डायरी" प्रसिध्द केली. माझी तीन पुस्तके प्रकाशित झाली. एप्रिल २०२४ मध्ये जगप्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरीत पेंटिंग प्रदर्शन भरवले. या कामाची दखल घेत महिलादिनी सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मान झाला. या सहभागामुळे माहेरी कौतुक झाले. हे सर्वात अभिमानास्पद वाटते.

**अनिता सावंत** - देशपांडे, पुणे, चित्रकार

## पवित्र मंदिरासमान काम



मी १९८५ - ८९ दरम्यान समितीत होतो. नेस वाडिया महाविद्यालयातून वाणिज्य शाखेची पदवी घेतली. नंतर पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातून पदव्युत्तर शिक्षण घेतले. उच्च दर्जाचे आणि उत्तम शिक्षण घेऊन सी. ए. अथवा स्पर्धा परीक्षांतून चांगले करिअर करण्याचे स्वप्न होते. पुण्यात शहरात राहण्याची व्यवस्था कशी होणार, असा प्रश्न असताना शेजारच्या गावातील कै. गोरक्षनाथ वर्पे यांनी मला समितीची माहिती दिली. माझा समितीत प्रवेश झाला. पण सुरूवातीला खूप त्रास वाटला. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास, त्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्यास क्षमता करणे, स्वतःचा विकास साधताना समाजाचा विचार करणे अशांतून विद्यार्थी घडवा यासाठी समितीचे काम आहे. कै. अच्युतराव आपटे, निर्मलाताई पुरंदरे, गो. ब. चव्हाण, यादवराव कुलकर्णी, वसंतराव गिंडीं अशी अनेक नावे आठवतात.

आमचे पर्यवेक्षक कै. रमाकांत तांबोळी. सर म्हणजे शिस्त आणि शिस्त म्हणजे सर, असे समीकरण होते. त्यांच्या कडक शिस्तीत राहणे कठीण होते. खरे तर मी सरांच्या शिस्तीला घाबरलो आणि समितीमध्ये राहू शकत नाही, असे वाटले. मी वैतागून कॉलेजच्या वसतिगृहात प्रवेश मिळतो का हे पाहिले. तेथील अस्वच्छता, गलिच्छपणा, बेशिस्त पाहून मी त्याची तुलना समितीबरोबर केली. समिती मला एखाद्या पवित्र मंदिरासमान वाटू लागली. माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला आणि मी समिती सोडण्याचा विचार सोडून दिला. सर्व उपक्रमांतील सहभागाने एके दिवशी तांबोळी सरांचा आवडता विद्यार्थी झालो. समितीने आदर्श विद्यार्थी म्हणून मला सन्मानित केले. समितीत अनेक मान्यवरांच्या सहवासाचा उपयोग स्पर्धा परीक्षेसाठी झाला. समाज शास्त्रज्ञ उषाताई बंबावाले त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा मला अभ्यासात झाला. मी तीन वेळा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवले आणि शासकीय सेवेत रुजू झालो.

**श्रीकृष्ण आनंदराव वाडेकर,**
अप्पर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.

## माझ्या यशात समितीचे योगदान



मी २००३ ते २००६ दरम्यान विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये लजपत विद्यार्थी भवनमध्ये राहिलो. त्यानंतर इंजिनिअरिंग झाल्यानंतर दोन वर्षे मुंबईला नोकरी केली. २००७-०८ साली मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये मास्टर्स करण्यासाठी गेलो. पुढे मी स्ट्रॅटजी आणि इनोव्हेशनमधे कॅलिफोर्निया सिटी युनिव्हर्सिटीमधून MBA पण केले. नंतर १७ ते १८ वर्षे अमेरिकेत वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम केले. त्यातही अँपल सोबत सीनियर प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून काम करता आले. त्यासोबतच वेगवेगळ्या विषयांवर रिसर्च पण केला आणि आनंदाची गोष्ट म्हणजे मला “टच सेन्सर मॅन्युफॅक्चरिंग मेथड्सवर“ पेटंट मिळाले. माझ्या या यशामध्ये विद्यार्थी साहाय्यक समितीचे खूप मोठे योगदान आहे. कारण योगासनापासून, प्राणायाम, मेडिटेशन आणि स्ट्रेस मॅनेजमेंटपर्यंत खूप सा-या गोष्टी विद्यार्थी साहाय्यक समितीमुळे मला प्राप्त करता आल्या. समितीतील सगळ्या शिकवणुकीचा वापर मला टीम बिल्डिंग, प्रोजेक्ट मॅनेजमेंटसाठी करता आला. मी गेल्या वर्षी भारतात परत आलो आणि इथे ३०० शेतकऱ्यांना घेऊन फार्मा प्रोड्युसर कंपनी चालू केली. या अंतर्गत गाई-म्हशीचे खाद्य, पोल्ट्री कॅटल फूड, गोट फार्मिंग फूड असा उद्योग आहे. सोलापूरमध्ये एक एआय कंपनी, सॉफ्टवेअर कंपनी पण चालू केली आहे. छोटीशी पतसंस्था, अशा गोष्टींवर काम सुरू आहे. मला कृष्णा आणि दुसरा कियाज अशी दोन मुलं आहेत. माझी पत्नी नलिनी सॉफ्ट्वेअर इंजिनिअर आहे. ती इंन्फोसिसमध्ये काम करते आहे.

**व्यंकट सिंदफळे,** उद्योजक

# साहाय्यदाते म्हणतात

## समिती : समाजासाठी उत्तम उदाहरण

विद्यार्थी साहाय्यक समितीने १९५५ पासून ग्रामीण भागातून पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जे काम केले आहे, ते खरेच खूप कौतुकास्पद आहे. परवडणाऱ्या दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले आहे. आज ७ वसतिगृहांमधून दरवर्षी १२०० हून अधिक मुलांना आधार मिळतो, ही खरेच अभिमानाची गोष्ट आहे.

समितीने आता अहिल्यानगर येथे विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे, ही दूरदृष्टीची योजना आहे. ज्या विद्यार्थ्यांना पुण्याला येणे शक्य नाही, त्यांच्यासाठी अहिल्यानगर हे उच्च शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. त्यामुळे, जेव्हा समिती तेथे मुलींचे पहिले वसतिगृह उभारण्यासाठी साडेपाच कोटी रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव घेऊन आमच्याकडे आली, तेव्हा आम्हाला खूप आनंद झाला. या प्रकल्पाला पाठिंबा देताना आम्हाला खूप समाधान मिळाले, कारण यामुळे ६० मुलींना एक सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळेल याची आम्हाला खात्री होती. समितीची निवड प्रक्रिया खूप पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण आहे. दरवर्षी विद्यार्थ्यांची निवड त्यांच्या पालकांसोबतच्या मुलाखतीतून केली जाते. विद्यार्थ्यांमधील प्रामाणिकपणा, क्षमता आणि चिकाटी या गुणांना प्राधान्य दिले जाते. समिती केवळ शैक्षणिकच नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्व, शिस्त आणि राष्ट्रीयत्वाची मूल्ये रुजवून त्यांना एक जबाबदार नागरिक बनवते. समितीचे हे कार्य आपल्या समाजासाठी एक उत्तम उदाहरण आहे. भविष्यातही ते असेच अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य उज्वल करतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या या महान कार्याला आमचा नेहमीच पाठिंबा राहील.

**सौ. परिमल आणि डॉ. प्रमोद चौधरी,**
परिमल व प्रमोद चौधरी फाउंडेशन, पुणे

## देणगीच्या प्रत्येक रुपयाचा प्रभावी वापर

खरी प्रगती व्यवसायाच्या पलीकडे असते, असा एपिरॉक परिवाराचा विश्वास आहे. सभोवतालच्या समुदायांना सक्षम करणे, शिक्षणाला चालना देणे आणि बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना उन्नत करणे, हे एपिरॉकचे उद्दिष्ट आहे. समितीसोबतचा आमचा दीर्घकालीन संबंध या विश्वासाचा पुरावा आहे. आमच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांद्वारे, आम्ही सौर ऊर्जा प्रणाली बसवण्यापासून ते ग्रंथालयाच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यापर्यंत आणि विद्यार्थ्यांना आर्थिक योगदान देण्यापर्यंत पाठिंबा दिला आहे.

समिती ही केवळ एक संस्था नाही, तर ती विश्वास, पारदर्शकता आणि परिवर्तनावर आधारित चळवळ आहे. कार्यपद्धतींमध्ये पूर्ण पारदर्शकता राखून, समितीने देणगीदारांमध्ये सातत्याने विश्वास निर्माण केला आहे. येथील देणगीच्या प्रत्येक रुपयाचा प्रभावीपणे वापर केला जातो. वसतिगृहापेक्षा आधुनिक गुरुकुल म्हणून इथे खरे कार्य चालते. विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, शिस्त आणि समग्र शिक्षण मिळते. खाणकाम आणि पायाभूत सुविधांमध्ये रुजलेली कंपनी म्हणून एपिरॉकमध्ये आम्ही शाश्वतता आणि सामाजिक योगदानाच्या वचनबद्धतेने प्रेरित आहोत. देणगी देण्यापूर्वी, अनेकदा एक महत्त्वाचा प्रश्न विचारला जातो : 'हीच संस्था का?' विद्यार्थी साहाय्यक समितीच्या बाबतीत उत्तर स्पष्ट आहे - येथील पारदर्शकता, मूल्याधारित वाढ आणि प्रभावी कार्यक्रमांबद्दलची वचनबद्धता. समिती टीमच्या समर्पणाची, समाजात करत असलेल्या सकारात्मक बदलाची आम्ही मनापासून प्रशंसा करतो. आम्ही एकत्रितपणे केवळ पायाभूत सुविधाच नव्हे तर भविष्यही निर्माण करतो. एपिरॉक या उत्तम कार्यासाठी त्यांच्यासोबत राहण्यास वचनबद्ध आहे.

**सीएसआर ग्रुप,** एपिरॉक मायनिंग इंडिया प्रा. लि.



## मदतीचा आनंद

अनेक वर्षांपासून समितीच्या कार्याविषयी ऐकत आहे. ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना पुण्यासारख्या ठिकाणी निवास, भोजन आणि सर्वांगीण विकासाची संधी मिळावी, यासाठी समिती प्रयत्नशील आहे. आम्ही पुणे सोडून ५५ वर्षे झाली असली तरी आमची नाळ अजूनही या शहराशी जोडलेली आहे. समितीच्या कार्याला मदत करता आल्याचा आनंद आहे.

**- सौ. रजनी आणि अशोक शेंदुरे**

## समितीच्या व्रताचे कौतुक



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जेव्हा शहरातील कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची संधी मिळते. तेव्हा राहण्यासाठी सुरक्षित आणि आरामशीर जागा मिळणे हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. अशा जागा गरजेच्या तुलनेत कमी असतात, अशा जास्त जागा निर्माण करून चांगले व्यवस्थापन करण्याच्या समितीने घेतलेल्या व्रताचे आम्हाला कौतुक वाटते. समितीच्या पुण्यातील वसतिगृहांना भेट दिल्यावर त्यांचे कर्मचारी,विद्यार्थी आणि नेतृत्व यांची निष्ठा बघून आम्ही प्रभावित झालो. अभ्यास करून आपल्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी आणखी अनेक विद्यार्थ्यांना अशा सकारात्मक वातावरणाची गरज आहे.

**- साधना आणि सुनील शेणॉय**



## कर्तव्यदक्ष नागरिक घडविण्याचे काम

समितीच्या कार्याची माहिती आमचे मित्र श्री. मकरंद फडके यांच्याकडून मिळाली. समितीचे काम खूपच कौतुकास्पद आहे. वसतिगृहात राबवले जाणारे उपक्रम, घर व गावापासून लांब राहणाऱ्या विद्यार्थ्यांना एक शिस्तबद्ध व संस्कारक्षम वातावरण मिळणे ही उल्लेखनीय गोष्ट आहे. ही संस्था उत्तम माणूस व कर्तव्यदक्ष नागरिक घडविण्याचे काम करते आहे. त्यामुळे समिती मुलींसाठी नवीन वसतिगृहाची उभारणी करत आहे हे ऐकून त्यातील खोल्यांसाठीच्या आर्थिक योगदानात आम्ही खारीचा वाटा उचलला. समितीच्या कार्याला शुभेच्छा!

**- सौ. अनिता व चंद्रशेखर पेंढरकर**

## विद्यार्थी पालकांच्या प्रतिक्रिया



समितीत मुलांना घरच्यासारखी वागणूक दिली जाते आणि येथे घरासारखेच वातावरण आहे. तसेच समितीकडून विद्यार्थ्यांना आर्थिक मदतही मिळते त्यामुळे आम्हालाही मुलांची काळजी वाटत नाही.

**- राणी माने** (राहुल माने याची आई)



समितीमधील कमवा आणि शिका, पाल्य-पालक, दररोज अर्धा तास काम, विद्यार्थी विकास केंद्रातील कार्यक्रम यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन होत आहे. उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे.

**- धोंडीभाऊ म्हस्के** (पर्णवी म्हस्के हिचे वडील)

# AUDITED FINANCIALS

## VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE

Registration No. : E-219 PAN: AAATS4498N

THE MAHARASHTRA PUBLIC TRUST ACT 1950, SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)]

Amount in Rupees

### Income & Expenditure for the year Ending 31st March 2025

| 2023-24 | Expenditure | 2024-25 | 2023-24 | Income | 2024-25 |
|---|---|---|---|---|---|
| | **Expenditure in respect of properties** | | 11,02,666 | Rent | 11,31,870 |
| 12,70,912 | Rates, Taxes, cesses | 12,65,203 | | **Interest** | |
| 1,68,51,424 | Major Repair | 7,32,255 | 1,27,32,969 | On Bank Account - on deposits | 1,81,75,525 |
| 22,43,207 | Salaries & Terminal Benefit | 23,66,947 | 3,93,165 | - on saving a/c | 1,24,290 |
| 23,35,295 | Establishment Expenses | 39,15,380 | | | |
| 34,000 | Legal Expenses. | 3,92,480 | 2,29,35,262 | Donation in cash or kind | 3,01,92,897 |
| 42,480 | Audit fees & Professional fees | 71,300 | 2,56,79,064 | Income from other sources | 3,66,87,405 |
| | | | 2,63,222 | Transfers from Reserves/Liabilities | 3,48,000 |
| 44,21,150 | Depreciation | 3,32,63,447 | | | |
| - | Transferred to Reserve / Specific Funds. | | | Deficit c/f to Balance Sheet | |
| | **Expenses on object of trust** | | | | |
| 2,35,04,648 | Educational /Relief to poor | 3,23,18,295 | | | |
| 6,81,816 | Medical Relief | 8,32,097 | | | |
| 1,17,21,416 | Surplus c/o to Balance Sheet- # | 1,15,02,583 | | | |
| **6,31,06,348** | **Total** | **8,66,59,987** | **6,31,06,348** | **Total** | **8,66,59,987** |

As per our Report on even date.

Dated : 21st August 2025

Place: PUNE

| | | | |
|---|---|---|---|
| **Tushar Ranjankar** | **Pratap G. Pawar** | **Sanjay Amrite** | **CA Santosh Pethe** |
| Managing Trustee | President | Treasurer | Torvi Pethe & Co |

# Surplus is represnted by specific donations rceived towards ongoing hostel project (Ahilyanagar) with expcted outlay of about Rs. 4 Cr.

# AUDITED FINANCIALS

## VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE

Registration No. : E-219  PAN: AAATS4498N

THE MAHARASHTRA PUBLIC TRUST ACT 1950, SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)]

Amount in Rupees

### BALANCE SHEET AS ON 31ST March 2025

| 31-03-2024 | Funds & Liabilities | 31-03-2025 | 31-03-2024 | Property & Asstes | 31-03-2025 |
|---|---|---|---|---|---|
| | **Trust funds or Corpus** | | 22,12,22,009 | Immovable Properties | 35,85,09,485 |
| 11,80,90,172 | Trust funds or Corpus | 17,76,28,840 | 1,46,04,656 | Furniture & Fixture | 3,56,77,917 |
| 29,80,06,728 | Other Earmarked Funds | 39,42,23,693 | 24,99,21,658 | Investments | 25,41,52,244 |
| | **Liabilities** | | 49,10,730 | Advances | 1,27,23,707 |
| 2,30,53,405 | For Expenses | 1,66,36,180 | | | |
| | For Advances | 1,01,09,163 | 1,33,003 | Mess Closing Stock | 1,40,171 |
| | Income and Expenditure Account | | | **Cash & Bank Balance** | |
| 4,01,03,282 | **Bal as per last Bal. Sheet:** | 5,18,24,698 | 1,80,775 | Saving Account | 7,18,750 |
| 1,17,21,416 | Add : Surplus | 1,15,02,583 | 2,172 | Cash in hand | 2,883 |
| | Less: Deficit current year | | | | |
| | Less:Trf to Repairs/ Reserve Fund | | | | |
| **49,09,75,003** | **Total** | **66,19,25,157** | **49,09,75,003** | **Total** | **66,19,25,157** |

As per our Report on even date.

Dated : 21st August 2025

Place: PUNE

**Tushar Ranjankar**
Managing Trustee

**Pratap G. Pawar**
President

**Sanjay Amrite**
Treasurer

**CA Santosh Pethe**
Torvi Pethe & Co

# Independent Audit Reoprt

To
**The Board of Trustees,**
Vidyarthi Sahayyak Samiti, 1184/1/4 F.C. Road, Pune 411 005.

**Report on the audit of the Financial Statements**
**Opinion**

We have audited the accompanying financial Statement of **Vidyarthi Sahayyak Samiti which comprise the Balance Sheet** as at **March 31, 2025**, the Income and Expenditure Account (Statement of Receipt and Payments or statement of Income and Expenditure) for the year ended, together with a summary of significant accounting policies and other explanatory notes.

In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the financial statements give a true and fair view in conformity with applicable accounting standard and regulatory requirements:

In the case of the **Balance Sheet**, of the state of affairs of the Samiti as at 31 March 2025;

In the case of the **Income and Expenditure Account**, of the surplus/ (Deficit) for the year ended on that date.

In the case of the **Receipts and Payments Statement** for the year ended on that date;in accordance with the accounting principle applicable to nonprofit organizations.

**Basis for Opinion**

We conducted our audit in accordance with the Standards on Auditing (SAs) issued by the Institute of Chartered Accountants of India (ICAI). Our responsibilities under those standards are further described in the Auditor's Responsibilities for the Audit of the financial statements section of this report. We are independent of Samiti in accordance with the relevant ethical requirements, and we have fulfilled our other ethical responsibilities in accordance with these requirements. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

**Key Audit Matters**

**Valuation of Investment:** verifying the fair value of investments held at year end.

**Donation compliance/utilization:** whether amounts from donors are use in accordance with donor conditions.

**Recognition of fixed assets/depreciation:** assessing whether capital assets are properly recorded and depreciated.

**Responsibilities of Management/Trustees for the Financial Statements**

The Trustees/Managing Committee are responsible for other information include in the annual report (other than the financial statements in an auditor's report thereon).

**Auditor's Responsibilities for the Audit of the Financial Statements**

Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statements as a whole are free from material misstatement, whether due to fraud or error, and to issue an auditor's report that includes our opinion. Reasonable assurance is a high level of assurance, but does not guarantee that an audit conducted in accordance with SAs will always detect a material misstatement when it exists.

**Report on Other Legal and Regulatory Requirements**

Financial statements prepared as per Maharashtra Public Trusts Act, Income Tax Act.

As required by the Maharashtra Public Trusts Act, we report that:

a) We have obtained all information and explanations which to the best of our knowledge and belief were necessary for the purposes of our audit;
b) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Samiti so far as appears from our examination of those books;
c) The financial statements of the Samiti comply with the applicable accounting standards and other regulatory provisions;
d) The Balance Sheet, Income & Expenditure Statement and Receipt & Payment Statement, together with the schedules and notes, give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view.

Date:21/08/2025
Place: Pune

**CA Santosh Pethe**
Partner- M.No. 104973
Torvi Pethe and Company

# कॉर्पोरेट क्षेत्रातील साहाय्यदाते

- एपिरॉक मायनिंग इंडिया लि.
- आरेया टेक्नॉलॉजीज
- भारत फोर्ज लि.
- बँक ऑफ इंडिया
- बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि.
- बेकर्ट मुकुंड वायर इंडस्ट्रिज प्रा. लि.
- डिमेक डेक्कन केमिकल प्रॉडक्टस प्रा. लि.
- डेलवाल फ्लो कंट्रोल्स प्रा. लि.
- फाइन ऑर्गेनिक इंडस्ट्रिज लि.
- फिडेल सॉफ्टटेक लि.
- फिशर मेजरमेंट टेक्नॉलॉजीज (इंडिया) प्रा. लि.
- एचएनबी इंजिनिअरिंग प्रा. लि.
- इनसाइट प्रिंट कम्युनिकेशन प्रा. लि.
- मोरडे फूड्स प्रा. लि.
- पर्सिस्टंट इंडिया फाउंडेशन
- पी. व्ही. टेक्सटाईल लि.
- ओटर कंट्रोल्स इंडिया प्रा. लि.
- रोश इन्फॉर्मेशन सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि.
- रिग्रीन एक्सेल इपीसी इंडिया प्रा. लि.
- सावा हेल्थकेअर लि.
- साई सर्व्हिस स्पेअर्स अँण्ड अँक्सेसरीज प्रा. लि.
- सोनाई दूध कंपनी लिमिटेड, इंदापूर
- टेक्नोफोर इलेकट्रॉनिक्स प्रा. लि.
- व्हीडीए इन्फोसोल्यूशन्स प्रा. लि.
- एक्सकॅलिबर इन्फोटेक प्रा. लि.
- यामाझाकी मझाक इंडिया प्रा. लि.

# आर्थिक मदत देणारे ट्रस्ट

- स्वाधार
- स्नेहसेवा
- दिशा परिवार
- आत्मजा फाउंडेशन
- वर्धमान ट्रस्ट
- एन. जी. भोसले ट्रस्ट
- एज्युकेट वन वर्ल्ड इ. व्ही.
- सुपर्णा चॅरिटेबल ट्रस्ट
- मराठवाडा मित्रमंडळ
- एस. टी. भटेवरा फाउंडेशन
- लीला पूनावाला फाउंडेशन
- शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट
- विश्वकर्मा पर्पल एज्युकेशन ट्रस्ट
- लेंड अ हॅण्ड इंडिया
- महाराष्ट्र फाउंडेशन
- गिरिलता पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट
- रूरल एज्युकेशन ट्रस्ट
- स्वादी चॅरिटेबल ट्रस्ट
- पंढरीनाथ गोपाळ ठकार एज्युकेशन ट्रस्ट
- सेवा सहयोग फाउंडेशन
- सावली चॅरिटेबल ट्रस्ट
- सुमती विनायक जोग सार्वजनिक विश्वस्त निधी

# आमचे नेतृत्व (कार्यकर्ते)


अरुणा अत्रे



अनिल खेतमाळीस


अंकुश तळेकर


ज्ञानेश्वर खैरे



दिनकर वैद्य


गणेश कळसकर


गणेश काळे


हरीष अष्टेकर


हरिष पाटणकर


हेमंत राजहंस



जिभाऊ शेवाळे



ज्योती गोगटे


मधुसूदन बडवे


मनोजकुमार गायकवाड


मनिषा गोसावी


मकरंद जोगळेकर


मकरंद फडके


मेधा पंडित



निसार चौगुले



नंदकुमार देशपांडे



नंदकुमार तळेकर


परशुराम दाते



प्रीती गोखले


प्रदीप मांडके



प्रकाश टेके


प्रभाकर पाटील


रवींद्र देशपांडे


रमेश घोटीकर


रत्नाकर मते


रवींद्र नामजोशी


राजेंद्र ततार



राजेंद्र गणपुले


संजय अमृते


शशी भाटे


सुनिल चोरे


सोपान गोंटला



श्रीधर कुलकर्णी


श्यामला जोशी


सुप्रिया केळवकर


सुनंदा पाटील


स्नेहा फडके


सुधीर राजगुरु


सुनिता झिंजाड


सुनील शास्त्री


सीमा होस्कोटे


सुरेश उमाप


शुभांगी चिरपूटकर



शिवाजी बोलभट


तुकाराम गायकवाड



तुषार रंजनकर



वासंती नाटेकर



विनया ठोंबरे



वल्लभ कोल्हटकर

## सन्माननीय कार्यकर्ते


अनिल कुलकर्णी


नामदेव खमितकर



प्रदीप तळवलकर


अशोक पाथरकर



प्रकाश अकोलकर


चंद्रशेखर दांडेकर


प्रभाकर वाल्हेकर


रमा देसाई


सुहासिनी बिवलकर


सुभाषचंद्र भोसले


उषा पालेकर


**खजिनदार**
संजय अमृते


**मुख्य विकास अधिकारी**
चंद्रकांत कुलकर्णी



**मुख्य कार्यपालन अधिकारी**
दुर्गेश पवार

# समितीच्या कार्यात आपण अशा प्रकारे सहभागी होऊ शकता

(समितीला मिळणाऱ्या देणग्या आयकर खात्याचा 80 G कलमानुसार कर सवलतीस पात्र आहेत.)

- सामान्य किंवा विशिष्ट कॉर्पससाठी देणगी देणे (उदा. इमारत निधी, ग्रंथनिधी, अन्ननिधी, वैद्यकीय निधी)
- १२०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या एकावेळच्या भोजनासाठी येणारा रु. १६००० इतका तुटवडा भरून येण्यासाठी देणगी देणे.
- पालकत्व योजनेसाठी वार्षिक किमान रु. २५,००० किंवा अधिक देऊन एका विद्यार्थ्याचे मार्गदर्शक होणे.
- समितीला प्रत्येक विद्यार्थ्यामागे एका वर्षात येणारी रु. ३४,००० इतकी तूट भरून येण्यासाठी एका विद्यार्थ्याचा खर्च उचलणे.
- समितीतील हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.
- समितीला उपयोगी पडतील अशी उपकरणे /वस्तू /पुस्तके यांची भेट देणे.
- समितीच्या कमवा व शिका योजनेखाली एका किंवा जास्त विद्यार्थ्यांना काम देणे.
- समितीने नवे प्रकल्प हाती घेतले आहेत. अशा प्रकल्पामध्ये एक खोली / कक्ष / पूर्ण इमारत / फर्निचर/ सौर ऊर्जा यंत्रणा अशा गोष्टींसाठी देणगी देणे.
- CSR/ संस्थात्मक आर्थिक मदत मिळवून देणे.
- समितीचा कार्यकर्ता म्हणून कार्याला वेळ देणे.
- विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमात विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त किंवा महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन देणे.

# आई-वडिलांचा संस्कार



'मी विद्यार्थी साहाय्यक समितीला ५ कोटी रु. देणगी देऊ इच्छितो. ही देणगी कॉर्पस फंडमध्ये ठेवण्यात यावी. या देणगीतून मिळणाऱ्या व्याजातून १५ टक्के रक्कम समितीने आपल्या खर्चासाठी वापरावी. उरलेल्या पैशांतून माझ्या नावे विविध उपक्रमांसाठी खर्च करावी. त्यामध्ये प्राधान्याने समितीचे उपक्रम असावेत. त्यातून पैसे शिल्लक राहिल्यास समाजात अनेक गरजू लोकांसाठी / विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या व्यक्ती / संस्था आहेत. त्यांना योग्य वाटेल तेवढी मदत करावी. यामुळे समितीचे काम हे फक्त समितीपुरते मर्यादित न राहता व्यापक व्हावे आणि समाजाला त्याचा अधिक उपयोग व्हावा, त्यांना प्रेरणा मिळावी हा हेतू आहे. आपण समाजाचे काही देणे लागतो हा माझ्या आई-वडिलांकडून मिळालेला संस्कार मी आजवर आचरणात आणला आहे. हा त्याचाच एक भाग मी मानतो. या देणगीच्या रकमेतून भविष्यातही अशा सामाजिक कामांना मदत व्हावी, अशी माझी इच्छा आहे.'

**- प्रताप पवार**

# विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे

(Public Charitable Trust No. E- 219 Pune)

११८२/१/ ४, शिवाजीनगर, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणे – ४११००५

E mail : info@samiti.org, www.samiti.org, Mob- 9404855530

Donations may be made by cheque drawn in favour of
VIDYARTHI SAHAYYAK SAMITI, PUNE

Donations given are eligible for
deduction under sec. 80 G of Income Tax Act.

Pan No. AAATS4498N, FCRA No. 083930059

## समितीला देणगी देण्यासाठी बँकेची माहिती

### स्थानिक (भारतातील) देणगीदारांसाठी

ICICI Bank : A/C No.000501060326

IFSC : ICIC0000039

Branch : Shivajinagar, Pune

### परदेशस्थ देणगीदारांसाठी

State Bank Of India, Main Branch, New Delhi

A/C No. 40282102047 (FCRA Saving Account)

Branch Code – 00691

IFSC : SBIN0000691

SWIFT CODE : SBININBB104

आपण देणगी ऑनलाइन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन ही माहिती समितीला info@samiti.org या मेलवर कृपया, तत्काळ पाठवावी ही विनंती.